**प्रमुख खनिज ब्लॉक्सच्या लिलाव प्रक्रियेसाठी Pre-Embedded Clearances प्राप्त करून देणे तसेच लिलावित खाणींच्या कार्यान्वयनावर देखरेख ठेवण्यासाठी SBI Capital Markets Limited (SBICAPS) यांची तृतीय पक्ष संस्था व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) म्हणून नियुक्ती करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**
**शासन निर्णय क्र.एमएनजी- ११२५/प्र.क्र.५५/उद्योग-९ब**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २७ फ़ेब्रुवारी, २०२६.

<u>वाचा :-</u>

१. महासंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचे पत्र क्र.MLK/४०२/PART/(२१)/३६२२, दि.१०.११.२०२५
२. महासंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचे पत्र क्र.Tech/S.G/१९५९/२०२५/३६२४, दि.१०.११.२०२५
३. संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचे पत्र क्र.एमएलव्ही/४०२/पार्ट/(२१)/२०२६/६२०, दि.१६.०२.२०२६
४. संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचे पत्र क्र.एमएलव्ही/४०२/पार्ट/२०२५/६३७, दि.१८.०२.२०२६

<u>प्रस्तावना -</u>

संदर्भाधीन पत्रान्वये महासंचालक, भुविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांनी प्रमुख खनिज ब्लॉक्सच्या लिलाव प्रक्रियेसाठी Pre-Embedded Clearances प्राप्त करून देणे तसेच लिलावित खाणींच्या कार्यान्वयनावर देखरेख ठेवण्यासाठी SBI Capital Markets Limited (SBICAPS) यांची तृतीय पक्ष संस्था व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (Project Monitoring Unit-PMU) म्हणून नियुक्ती करण्यास व त्यायोगे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात येणाऱ्या खर्चास अधिक इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता.

खाण मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. १४.१०.२०२५ रोजी झालेल्या बैठकीत विविध राज्यांमध्ये लिलावित प्रमुख खनिज गटांच्या कार्यान्वयनात होत असलेल्या विलंबाबाबत चर्चा करण्यात आली. अनेक प्रकरणांत यशस्वी बोलीदारांकडून पर्यावरण (EC), वन (FC) व इतर वैधानिक मंजुरी वेळेत प्राप्त न झाल्यामुळे हेतूपत्र (LOI) कालबाह्य होऊन पुनर्लिलावाची आवश्यकता निर्माण होत आहे. भारत सरकारच्या दि. ०३.०६.२०२२ च्या अधिसूचनेनुसार Pre-Embedded Clearances यंत्रणेअंतर्गत लिलावपूर्व आवश्यक वैधानिक मंजुरी तृतीय पक्ष संस्थेमार्फत प्राप्त करून घेण्याची तरतूद केली आहे. तसेच दि. १७.१०.२०२५ रोजी Minerals (Auction) Rules मध्ये करण्यात आलेल्या सुधारणांनुसार लिलावानंतरच्या कार्यान्वयनासाठी निश्चित कालमर्यादा निर्धारित करण्यात आली आहे. यासाठी येणारा खर्च हा ज्या खाणपट्टाधारकास हा खाणपट्टा मंजूर करण्यात येईल, त्यांच्याकडून वसूल करण्यात येईल. अशा रितीने शासनावर खर्चाचा बोजा पडणार नाही.

सद्यस्थितीत राज्यातील काही खनिज ब्लॉक्सच्या बाबतीत हेतूपत्र कालबाह्य झाल्याने पुनर्लिलाव प्रस्तावित आहे. तसेच पाच खनिज ब्लॉक्स Pre-Embedded Clearances यंत्रणेअंतर्गत लिलावासाठी प्रस्तावित आहेत. या अनुषंगाने भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांनी तज्ञ संस्थेची नियुक्ती करण्याची आवश्यकता दर्शविली असल्याने SBI Capital Markets Limited (SBICAPS) या संस्थेची नियुक्ती करण्यास शासन विचाराधीन होते.

**<u>शासन निर्णय</u>** -

प्रमुख खनिज ब्लॉक्सच्या लिलाव प्रक्रियेसाठी Pre-Embedded Clearances प्राप्त करून देणे तसेच लिलावित खाणींच्या कार्यान्वयनावर देखरेख ठेवण्यासाठी SBI Capital Markets Limited (SBICAPS) यांची तृतीय पक्ष संस्था व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (Project Monitoring Unit) (PMU) म्हणून नियुक्ती करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. SBICAPS मार्फत खालील कार्ये करण्यात येतील :

अ. या कार्यासाठी SBICAPS कडून दोन तज्ञ मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येईल.

आ. लिलावपूर्व आवश्यक वैधानिक मंजुरी (EC, FC इ.) प्राप्त करण्याबाबत समन्वय व सल्लागार सेवा.

इ. लिलाव प्रक्रिया सुलभ करणे व शासनास तांत्रिक सहाय्य प्रदान करणे.

ई. लिलावित खाणींच्या कार्यान्वयनावर कालमर्यादेनुसार देखरेख ठेवणे.

उ. Minerals (Auction) Rules, २०१५ व त्यानंतरच्या सुधारणांनुसार निर्धारित कालमर्यादांचे पालन सुनिश्चित करणे.

३. उपरोक्त कार्यवाहीसाठी सदर संस्थेस खालीलप्रमाणे शुल्क अनुज्ञेय असेल.

अ. खाणपट्टयाच्या पूर्व अंतर्भूत परवानग्यासाठी (Pre-Embedded Clearances) मंजूर मानधन (जास्तीत-जास्त) Per Approval Fee (applicable for each mineral block individually):

- Mining Plan: 20.00 Lakhs
- Environmental Clearence (EC): 20.00 Lakhs
- Forest Clearance (FC, if applicable): 25.00 lakh
- Consent to Establish (CTE): 12.00 Lakhs
- Other Clearances (Per clearance, if any): Amount between 7.5 Lakh to Depending upon the clearance

ब. उपरोक्त कामासाठी नियुक्त दोन सल्लागारांसाठी येणारा वार्षिक खर्च.

४. अशा रितीने, राज्यातील खनिज ब्लॉक्सच्या प्रभावी व वेळेत कार्यान्वयनासाठी ई-ऑक्शनमध्ये लिलावासाठी ठेवावयाच्या ब्लॉक्सच्या Pre-Embedded clearance साठी SBICAPS यांची तृतीय पक्ष संस्था तसेच प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (Project Monitoring Unit-PMU) म्हणून नियुक्ती करण्यास व दोन सल्लागारांच्या नियुक्तीपोटी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात येणारा खर्च अधिक उपरोक्त फ़ी स्ट्रक्चर नुसार येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. या संदर्भातील सविस्तर अटी व शर्ती, कार्यव्याप्ती व देयकाबाबतच्या अटी महासंचालकांनी स्वतंत्र करारनाम्यात नमूद कराव्यात. पुर्व अंतर्भूत परवानगी या संकल्पने अंतर्गत SBICAPS यांची नियुक्ती केलेली असल्याने त्यांना अदा करावयाचे पूर्वपरवानगी शुल्क शासनाकडून

प्रथम त्यांना अदा करण्यात येईल. त्यानंतर, या कार्यपध्दतीत ठरविण्यात आल्या नुसार असा खाणपट्टा ज्या कंपनीस/व्यक्तीस मंजूर होईल त्यांच्याकडून या अन्वये होणारा संपूर्ण खर्च वसूल करण्यात येईल व तशी तरतूद यासंदर्भातील निविदा कागदपत्रात करण्याची जबाबदारी महासंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय यांची असेल.

५. यासाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात होणारा खर्च “मागणी क्र.के-७, २८५३, अलोहयुक्त खाणकाम व धातूशास्त्रीय उद्योग, १०२(००)(०५) खनिज विकास (अनिवार्य), ३१, सहायक अनुदाने (वेतनेत्तर) (२८५३०१३२)” या लेखाशिर्षाखाली उपलब्ध झालेल्या रु. १० कोटी एवढ्या पूरक मागणीतून भागविण्यात येईल.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र २०१३/ प्र.क्र.३०/ २०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-१ उप विभाग-३ मधील अ.क्र. ४ परिच्छेद क्र. २७(२) अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. यासाठी महासंचालक यांच्याकडून तपशीलवार आर्थिक प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर निधी वितरणाबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील. निधी वितरणाच्या प्रस्तावासोबत करारनामा व तसेच खर्चाचे सविस्तर विवरणपत्र महासंचालक, भुविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांनी शासनास सादर करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०२२७१३३६१३९८१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJENDRA
MOHANDAS MAHAJAN

Digitally signed by RAJENDRA MOHANDAS MAHAJAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD,
2.5.4.20=F461CF4C11F9A3F5DA7123F7DCD4E2EA50CD885AF0483D1
6364E6C279F85B276, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=3228433608D320B146F02EEF08CC0995EDCCCC9A379
C058F350AC391E201B3EA, cn=RAJENDRA MOHANDAS MAHAJAN
Date: 2026.02.27 13:37:12 +05'30'

**(राजेंद्र महाजन)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. महासंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर
२. संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
३. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर. (संचालनालयामार्फत)
४. SBICAPS, १५०१, १५ वा मजला, A & B विंग, परीनी क्रेसेन्झो, बीकेसी, वांद्रे पूर्व, मुंबई-४०० ०५१.
५. निवडनस्ती (उद्योग-९ब)